# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : 2अ/एडीएम/2016/ ८२०
दिनांक : 21 JUN 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

**विषय : शैक्षणिक वर्ष 2016-17 मधील व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चिती केंद्रांबाबत(ARC).....**

संदर्भ : संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक 2अ/एडीजी/एडीएम/2016-17/एआरसी/758, दिनांक 13.6.2016

शैक्षणिक वर्ष 2016-17 मधील व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसंदर्भाने प्रवेश निश्चिती केंद्रांची महत्वाची भूमिका असणार आहे. संदर्भाधीन आदेशान्वये राज्यातील सर्व प्रवेश निश्चिती केंद्र (ARC)घोषित करण्यात आलेली आहेत. प्रवेश निश्चिती केंद्रांच्या जबाबदा-या, प्रवेश निश्चिती केंद्रांना आवश्यक सूचना, प्रवेश निश्चिती केंद्रांवर आवश्यक असणा-या तांत्रिक आणि प्रशासकीय बाबीही संदर्भाधीन आदेशान्वये कळविण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व प्रवेश निश्चिती केंद्रांचा आदेशातील बाबी विचारात घेऊन सर्वंकष आढावा घेण्यात यावा. कोणत्याही प्रवेश निश्चिती केंद्रावर विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी काही अडचण उद्‌भवणार नाही याची खात्री करण्यात यावी. तसेच विभागातील प्रवेश निश्चिती केंद्रांच्या काही अडचणी असतील तर त्यांचे तात्काळ निराकरण करण्यात यावे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू झालेल्या असून केंद्रीभूत प्रवेश फेरीमध्ये प्रवेश प्रदान करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवेश निश्चित करताना कोणतीही अडचण येणार नाही ; प्रवेश निश्चिती केंद्रावर विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेण्याबाबत आपल्या विभागातील सर्व प्रवेश निश्चिती केंद्रांना कळविण्यात यावे. सर्व प्रवेश निश्चिती केंद्राचा यासंदर्भात आढावा घेऊन त्यानुसार संचालनालयास अवगत करण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

शिक्षण
3580 21/6/16

**ई-मेलव्दारे**

**सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती**
जा.क्र. विकाअ/शिक्षण/पदवीका प्रवेश/२०१३/ 2265
दिनांक :- 22 JUN 2016

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायीक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश निश्चिती केन्द्र,
अमरावती विभाग.

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती